जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष जि.प.यवतमाळ रिक्त पदे भरण्यासाठीची
जाहीरात जा.क्र. 492 /2019 दिनांक- 10.7.2019

संदर्भ -1) महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शा.नि.क्र.ग्रापाधो 1112/प्र.क्र.204/पापु-07 मंत्रालय मुंबई 400032 दिनांक 12/12/2012.
2) पत्र /जावक /क्रंमाक वासो-4/मविशा/प्र.क्र.128/2019-20/1564 दिनांक 21/5/2019.

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन अंतर्गत गट संसाधन केद्रांतील खालील कंत्राटी स्वरुपातील रिक्त पद भरणे करीता जाहीरात देण्यात येत आहे. त्यासंबंधी पदाचा संवर्ग,शैक्षणिक अर्हता,अनुभव,मासिक मानधन,अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र | प्रकल्पाचे नाव | पदाचा संवर्ग | तालुकानिहाय पद संख्या | शैक्षणिक अर्हता व अनुभव | मासिक मानधन/ प्रवासभत्ता मोबाईल/दुरध्वनी भत्ता. | वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (गट संसाधन केद्र) | गट समन्वयक | एकुण- 3 पदे<br>अ.ज.- 1 (सर्वसाधारण)<br>खुला-2 ( महिला-1) (सर्वसाधारण-1) | **अर्हता-**<br>बी.एस.डब्लु,(BSW)किंवा प्रसिध्दी माध्यमे/समाजविज्ञान शास्त्रातील पदवीधर.<br>**प्राधान्य-**<br>एम.एस.डब्लु.(MSW).<br>**अनुभव-** ग्रामीण भागात ,ग्रामीण पाणी पुरवठा समित्या ,पाणी गुणवत्ता व सनियत्रण,ग्रामीण स्वच्छता आरोग्य विषयक कामाचा किमान दोन वर्षाचा अनुभव (शासकीय) | मासिक मानधन 6000/- प्रवासभत्ता रुपये 1500/- दरमहा एकत्रीत मोबाईल दुरध्वनी भत्ता रुपये 1000/- दरमहा एकत्रीत | 25 ते 35 वर्ष ,माजी सैनिकांसाठी उच्चतम वयोमर्यादा 45 वर्ष |
| 2 | | समुह समन्वयक | एकुण- 3 पदे<br>अ.ज.- 1 (सर्वसाधारण)<br>खुला-2 ( महिला-1) (सर्वसाधारण-1) | **अर्हता-**<br>बी.एस.डब्लु,(BSW) किंवा प्रसिध्दी माध्यमे /समाज विज्ञानशास्त्रातील पदवीधर<br>**प्राधान्य-**<br>एम एस डब्लु (MSW).<br>**अनुभव** - ग्रामीण भागात ,ग्रामीण पाणी पुरवठा समित्या ,पाणी गुणवत्ता व सनियत्रण, ग्रामीण स्वच्छता आरोग्य विषयक कामाचा किमान दोन वर्षाचा अनुभव (शासकीय) | मासिक मानधन 5500/- प्रवास भत्ता रु.1500/- मोबाईल/ दुरध्वनी भत्ता रु. 1000/- एकत्रीत दरमहा | 25 ते 35 वर्ष ,माजी सैनिकांसाठी उच्चतम वयोमर्यादा 45 वर्ष |

अटी व शर्ती-

1 वरील पदावर निवड झालेल्या उमेदवाराने शासन निर्णयातील तरतुदीनुसार रुपये 100/- च्या स्टॅपपेपर जोडपत्र ५ नुसार करारनामा करुन देणे बंधनकारक राहील.

2. वरील पदाकरीता नियुक्ती कंत्राटी स्वरुपातील असून 11 महीन्याचे कालावधी करीता तात्पुरत्या स्वरुपात राहील. ज्या उमेदवाराचे कामकाज समाधानकारक असेल त्यांना मुदतवाढ देवुन पुर्ननियुक्ती देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. यवतमाळ यांना राहील. त्यावर अपील करता येणार नाही .

3. उमेदवाराने अर्जासोबत शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र ,टिसी शैक्षणिक अर्हता, गुणपत्रिका, जात प्रमाणपत्र व जाती वैधता प्रमाणपत्र सांक्षाकीत प्रती जोडणे आवश्यक राहील.

4. गट समन्वयक ,समुह समन्वयक याचे मोठया संख्येने अर्ज प्राप्त झाल्यास 50 मार्काची लेखी परिक्षा घेण्यात येईल. लेखी परिक्षेचा दिनांक नंतर कळविल्या जाईल .

5. निवड झालेल्या उमेदवारास शासन निर्णयानुसार नेमून दिलेल्या कार्यसुची नूसार व नेमून दिलेल्या तालुक्यात काम करणे बंधनकारक राहील. स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

6. पद भरती रदद करणे ,किंवा स्थगिती देणे याबाबतचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.यवतमाळ यांना राहील.

7. जाहीरातीतील पद कंत्राटी व तात्पुरत्या स्वरुपात असल्यामुळे सदर पदावर नियुक्त झालेल्या उमेदवाराने राजीनामा दिल्यास किंवा नोकरी सोडुन गेल्यास जाहीरातीच्या दिनांकापासुन एक वर्षापर्यत प्रतिक्षा यादीवरील उमेदवाराचा विचार करण्यात येईल.

8. जास्त प्रमाणात अर्ज प्राप्त झाल्यास पात्र उमेदवाराची लेखी परिक्षा व मौखीक मुलाखत घेतल्यानंतर त्याचा निकाल कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात येईल वैयक्तीक रित्या कळविण्यात येणार नाही.

9. अनुभव पाणी व स्वच्छता क्षेत्राशी सबंधीत शासकीय असल्यास ग्राहय धरला जाईल.

10. एकापेक्षा अधिक उमेदवाराना समान गुण पडल्यास ज्याचे वय जास्त आहे त्या उमेदवाराचा विचार प्राधान्याने केला जाईल.

11. जाहीरातीतील पदे आरक्षणानुसार गुणवत्तेनी (मेरीट लिस्ट) भरण्यात येतील.

12. गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवाराची रिक्त तालुक्यात पदस्थापना दिल्यास सदर तालुकयात नेमुन दिलेले कामकाज करणे आवश्यक राहील.

13. जाहीरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ते दिनांक 22.07.19 5.30 वाजेपर्यत अर्जदाराचे अर्ज स्विकारले जातील.

14. विहीत नमुन्यातील अर्जासोबत उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पा.व स्व.) जि.प.यवतमाळ यांचे नावे रु.200/- चा धनाकर्ष (DD) जोडणे आवश्यक आहे.

15.शासकीय/निमशासकीय कर्मचा-यानी त्यांचे अर्ज त्यांच्या सबंधीत नियुक्ती प्राधिकरणाच्या परवानगीने भरावयाचा आहे अशी परवानगी प्राप्त केल्याची प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे .

16.निवड प्रकिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने दिलेली माहीती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहीती दडवून ठेवल्याचे निर्दशनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती बाद करण्यात येईल , शासनाची दिशाभुल केल्या प्रकरणी सदर उमेदवारा विरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

17. चारीत्र्य पडताळणी अंती आक्षेपार्ह बाबी आढळुन असल्यास सबंधीत उमेदवार नियुक्तीसाठी/सेवेसाठी पात्र राहणार नाही तसेच कोणत्याही टप्यावर असे उमेदवार अपात्र राहतील.

18. सदर जाहीरात जि.प. यवतमाळ चे वेबसाईट www.zpyavatmal.gov.in वर प्रसीध्द करण्यात येईल.

19. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रं.बीसीसी २०११/प्रक्र१०६४/२०११/१६ब दिनांक १२ डिसेंबर २०११ नुसार मागासवर्गीय उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील शासन निर्णय दिनांक १२/१२/२०११ अन्वये निवड यादीत निवड झालेल्या उमेदवाराकडे जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास ६ महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास संबंधीत उमेदवारास सेवेतुन कमी करण्यात येईल.

21. महिला आरक्षणाचा लाभ घेऊ ईच्छीणा-या खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांनी उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट क्रिमिलीअर यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिका-याने दिलेले अलिकडील / नविनतम मुळ नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांका पर्यत प्राप्त करणे आवश्यक राहील. सदर प्रमाणपत्राची पडताळणी कागदपत्र तपासणीच्या वेळी करण्यात येईल.

(मनोजकुमार चौधर)
उपमुख्यकार्यकारी अधिकारी ( पा.व स्व.)
जिल्हा परिषद यवतमाळ

(जलज शर्मा )
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद यवतमाळ